**स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार सन २०१८ जाहीर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**मराठी भाषा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः रावापु-२०१९/प्र.क्र.४७/भाषा-३,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक: ५ फेब्रुवारी, २०२०**

**वाचा :-**

१) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.रावापु-१०१२/प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३, दिनांक १० सप्टेंबर, २०१२.

२) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.रावापु-१०१४/प्र.क्र.२३/२०१४/भाषा-३, दिनांक १० सप्टेंबर, २०१४.

३) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. रावापु-१०१४/प्र.क्र.१२०/२०१४/भाषा-३, दिनांक २ फेब्रुवारी, २०१६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील व राज्याबाहेरील ज्या लेखकांनी मराठी भाषेत वाङ्मय निर्मिती केली आहे अशा लेखकांकडून विविध वाङ्मय प्रकारातील पुस्तके स्वीकारण्यात येतात. सन २०१८ या वर्षात निर्मिती करण्यात आलेल्या / प्रथम प्रकाशित झालेल्या मराठी साहित्यास दि.१० सप्टेंबर, २०१२ व दि.२ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयानुसार स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार-२०१८ जाहीर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

सन २०१८ या वर्षात निर्मिती करण्यात आलेल्या / प्रथम प्रकाशित झालेल्या मराठी साहित्यास स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या परीक्षण समितीच्या निकालपत्रानुसार सदर पुरस्कारासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या ३५ लेखक / साहित्यिकांची नांवे सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्रातील यादीप्रमाणे जाहीर करण्यास व सदर पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या साहित्यिकांना, संदर्भाधीन दिनांक १० सप्टेंबर, २०१२ व दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयानुसार संबंधित पुरस्कार प्रदान करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार - २०१८ करीता प्रदान करावयाच्या पुरस्काराची रोख रक्कम संदर्भाधीन दिनांक १० सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयातील जोडपत्र -१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जास्तीत जास्त रु.१,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) व कमीत कमी रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) असेल. पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. सदर पुरस्काराच्या यादीमध्ये कोणत्या वाङ्मय प्रकारास कोणता पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे, त्याचे नांव, तसेच संबंधित लेखकाचे, पुस्तकाचे व प्रकाशन संस्थेचे नांव आणि पुरस्काराची रक्कम नमूद करण्यात आली असून, पात्र ठरविण्यात आलेल्या ३५ लेखक/ साहित्यिकांच्या नांवाचे विवरणपत्र सोबत जोडत आहे.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. या प्रित्यर्थ होणारा खर्च “मागणी क्र.झेडएफ - ०२, २२०५ - कला व संस्कृती - ०० - १०२ कला व संस्कृती प्रचालन ०1 (योजनेतर योजना) (०१)(०३) - उत्तम पुस्तकांना उत्तेजन (२२०५ ३१९९) ५० इतर खर्च (योजनेतर)” या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२०२० या वर्षात मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००२०४१२५१२४९८३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
DN: CN = Aparna Arvind Gawde, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Marathi Language
Date: 2020.02.05 09:54:30 +05'30'

**(अपर्णा अ. गावडे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

२. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
३. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव,
४. सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
११. संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,
१२. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१३. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१४. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. भाषा - ३ (संग्रहार्थ).

# विवरणपत्र

## शासन निर्णय क्रमांक रावापु-२०१९/प्र.क्र.४७/भाषा-३, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२० चे सहपत्र

## सन २०१८ या वर्षाकरीता उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या लेखक / साहित्यिकांची यादी

| अ.क्र. | वाङ्मय प्रकार | पुरस्कार | रक्कम रु. | लेखकाचे नाव | पुस्तकाचे नांव | प्रकाशन संस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रौढ वाङ्मय - काव्य | कवी केशवसूत पुरस्कार | १,००,०००/- | रवीन्द्र दामोदर लाखे | अवस्थांतराच्या कविता | कॉपर कॉइन पब्लिशिंग प्रा. लि., गाजियाबाद, दिल्ली |
| २. | प्रथम प्रकाशन - काव्य | बहिणाबाई चौधरी पुरस्कार | ५०,०००/- | राही डहाके | हजार रक्तवर्णी सूर्य | कॉपर कॉइन पब्लिशिंग प्रा. लि., गाजियाबाद, दिल्ली |
| ३. | प्रौढ वाङ्मय - नाटक/एकांकिका | राम गणेश गडकरी पुरस्कार | १,००,०००/- | अजित दळवी | समाजस्वास्थ्य | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई |
| ४. | प्रथम प्रकाशन - नाटक/एकांकिका | विजय तेंडूलकर पुरस्कार | ५०,०००/- | प्राजक्त देशमुख | देवबाभळी | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई |
| ५. | प्रौढ वाङ्मय - कादंबरी | हरी नारायण आपटे पुरस्कार | १,००,०००/- | किरण गुरव | जुगाड | दर्या प्रकाशन, पुणे |
| ६. | प्रथम प्रकाशन - कादंबरी | श्री.ना.पेंडसे पुरस्कार | ५०,०००/- | संग्राम गायकवाड | आटपाट देशातल्या गोष्टी | मनोविकास प्रकाशन, पुणे |
| ७. | प्रौढ वाङ्मय - लघुकथा | दिवाकर कृष्ण पुरस्कार | १,००,०००/- | विलास सिंदगीकर | बाजार | इसाप प्रकाशन, नांदेड |
| ८. | प्रथम प्रकाशन - लघुकथा | ग.ल.ठोकळ पुरस्कार | ५०,०००/- | दिनकर कुटे | कायधूळ | हर्मिस प्रकाशन, पुणे |
| ९. | प्रौढ वाङ्मय - ललितगद्य (ललित विज्ञानासह) | अनंत काणेकर पुरस्कार | १,००,०००/- | विनया जंगले | मुक्या वेदना, बोलक्या संवेदना | मौज प्रकाशन गृह, मुंबई |
| १०. | प्रथम प्रकाशन - ललितगद्य | ताराबाई शिंदे पुरस्कार | ५०,०००/- | नीलिमा क्षत्रिय | दिवस आलापल्लीचे | ग्रंथाली, मुंबई |
| ११. | प्रौढ वाङ्मय - विनोद | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार | १,००,०००/- | ज्युनियर ब्रह्मे (रुपेश कुडुचकर) | ब्रह्मेघोटाळा | वॉटरमार्क पब्लिकेशन, पुणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२. | प्रौढ वाङ्मय - चरित्र | न.चिं.केळकर पुरस्कार | १,००,०००/- | सुनिता तांबे | सागर रेड्डी<br>नाम तो सुना होगा | अक्षयभारती प्रकाशन, मुंबई |
| १३. | प्रौढ वाङ्मय -आत्मचरित्र | लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार | १,००,०००/- | गो. तु. पाटील | ओल अंतरीची... | जयप्रकाश रामचंद्र लब्दे |
| १४. | प्रौढ वाङ्मय - समीक्षा/ वाङ्मयीन संशोधन/ सौंदर्यशास्त्र/ ललितकला आस्वादपर लेखन | श्री. के. क्षीरसागर पुरस्कार | १,००,०००/- | डॉ.पराग घोंगे | अभिनय चिंतन<br>भरतमुनी ते बर्टोल्ट ब्रेख्त | विजय प्रकाशन, नागपूर |
| १५. | प्रथम प्रकाशन -<br>समीक्षा सौंदर्यशास्त्र | रा.भा.पाटणकर पुरस्कार | ५०,०००/- | दा. गो. काळे | आकळ | कॉपर कॉईन पब्लिशिंग प्रा. लि., गाजियाबाद, दिल्ली |
| १६. | प्रौढ वाङ्मय -<br>राज्यशास्त्र/समाजशास्त्र | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार | १,००,०००/- | मंगला गोडबोले | सती ते सरोगसी | राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे |
| १७. | प्रौढ वाङ्मय - इतिहास | शाहू महाराज पुरस्कार | १,००,०००/- | नरेन्द्र चपळगावकर | त्यांना समजून घेताना | राजहंस प्रकाशन प्रा. लि. पुणे |
| १८. | प्रौढ वाङ्मय -<br>भाषाशास्त्र/व्याकरण | नरहर कुरूंदकर पुरस्कार | १,००,०००/- | डॉ.शामकांत मोरे | मालवणी बोली शब्दकोश | सुमेरु प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, डोंबिवली |
| १९. | प्रौढ वाङ्मय -<br>विज्ञान व तंत्रज्ञान<br>(संगणक व इंटरनेटसह) | महात्मा ज्योतिराव फुले पुरस्कार | १,००,०००/- | डॉ.पुष्पा खरे व<br>डॉ.अजित केंभावी | गुरुत्वीय तरंग | राजहंस प्रकाशन<br>प्रा. लि., पुणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २०. | प्रौढ वाङ्मय - शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय लेखनासह | वसंतराव नाईक पुरस्कार | १,००,०००/- | प्रा.डॉ.द.ता. भोसले | संवाद बळीराजाशी | सकाळ मीडिया प्रा.लि., पुणे |
| २१. | प्रौढ वाङ्मय - उपेक्षितांचे साहित्य (वंचित, शोषित, पिडीत, आदिवासी, कष्टकरी, अनुसूचित जाती व नव बौद्ध इत्यादी) | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार | १,००,०००/- | प्रा. रुपाली अवचरे | वामन निंबाळकरांची कविता : स्वरुप आणि आकलन | यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे |
| २२. | प्रौढ वाङ्मय - अर्थशास्त्र व अर्थशास्त्र-विषयक लेखन | सी.डी. देशमुख पुरस्कार | १,००,०००/- | जयराज साळगावकर | बिटकॉईन क्रिप्टोकरन्सी | परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे |
| २३. | प्रौढ वाङ्मय - तत्त्वज्ञान व मानसशास्त्र | ना.गो. नांदापूरकर पुरस्कार | १,००,०००/- | डॉ. सतीश पावडे | द थिएटर ऑफ द ॲब्सर्ड | विजय प्रकाशन, नागपूर |
| २४. | प्रौढ वाङ्मय - शिक्षणशास्त्र | कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार | १,००,०००/- | डॉ. पुरुषोत्तम भापकर | शैक्षणिक षटकार | साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद |
| २५. | प्रौढ वाङ्मय - पर्यावरण | डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार | १,००,०००/- | डॉ. संदीप श्रोत्री | कासवांचे बेट | राजहंस प्रकाशन प्रा. लि., पुणे |
| २६. | प्रौढ वाङ्मय - संपादित/ आधारित | रा.ना.चव्हाण पुरस्कार | १,००,०००/- | संपादक प्रभा गणोरकर | आशा बगे यांच्या निवडक कथा | पद्मगंधा प्रकाशन, पुणे |
| २७. | प्रौढ वाङ्मय - अनुवादित | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार | १,००,०००/- | अनुवादक मेघा पानसरे | सोविएत रशियन कथा | लोकवाङ्मय गृह प्रा.लि., मुंबई |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८. | प्रौढ वाङ्मय - संकीर्ण (क्रीडासह) | भाई माधवराव बागल पुरस्कार | १,००,०००/- | संजय झेंडे | पाणीदार माणसं | लोकवाङ्मय गृह, मुंबई |
| २९. | बालवाङ्मय - कविता | बालकवी पुरस्कार | ५०,०००/- | गणेश घुले | सुंदर माझी शाळा | ग्रंथाली, मुंबई |
| ३०. | बालवाङ्मय - नाटक व एकांकिका | भा.रा. भागवत पुरस्कार | ५०,०००/- | डॉ.व्यंकटेश जंबगी | बालमंच : बाल एकांकिका संग्रह | कवितासागर पब्लिशिंग हाऊस, जयसिंगपूर, कोल्हापूर |
| ३१. | बालवाङ्मय - कादंबरी | साने गुरूजी पुरस्कार | ५०,०००/- | डॉ.सुमन नवलकर | काटेरी मुकुट | सुगम प्रकाशन, अमरावती |
| ३२. | बालवाङ्मय - कथा ( छोटया गोष्टी, परीकथा, लोककथांसह) | राजा मंगळवेढेकर पुरस्कार | ५०,०००/- | मृणालिनी वनारसे | प्रश्नांचा दिवस | आय.ए.पी.ए.आर. कलाछाया सांस्कृतिक केंद्र, पुणे |
| ३३. | बालवाङ्मय - सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे) | यदुनाथ थत्ते पुरस्कार | ५०,०००/- | आनंद घैसास | ताऱ्यांचा जन्म-मृत्यू | मनोविकास प्रकाशन, पुणे |
| ३४. | बालवाङ्मय - संकीर्ण | ना.धो. ताम्हणकर पुरस्कार | ५०,०००/- | आशा केतकर | थोर संशोधक | अभिनुजा प्रकाशन, पुणे |
| ३५. | सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार | सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार | १,००,०००/- | द. तु. पाटील | चैत | मौज प्रकाशन गृह, मुंबई |